# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ- संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक-08.09.2026 वार- मंगळवार

**भरती परीक्षा पुणे**

राज्यातली भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी राज्य शासनानं उच्चस्तरीय कृती समिती नियुक्त केली आहे. ही समिती पुणे विभागातले विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, शैक्षणिक संस्था, परीक्षा यंत्रणा आणि विषयतज्ज्ञांशी १२ सप्टेंबर रोजी थेट संवाद साधणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सकाळी १०.३० ते संध्याकाळी ५.३० दरम्यान होणाऱ्या या संवादात पुणे जिल्ह्यासह पुणे महसूल विभागातल्या संबंधित घटकांना सहभागी होता येईल. या संवादात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी आपल्या सूचना आणि अभिप्राय गुरुवारी, १० सप्टेंबरपर्यंत "Pune-ExamReformsTaskforce@maharashtra.gov.in" या ई-मेलवर पाठवावेत. शुक्रवारी संबंधित व्यक्ती आणि संस्थांना चर्चेची वेळ कळवण्यात येईल, असं जिल्हा प्रशासनानं कळवलं आहे.

**रोजगार मेळावा**

राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागानं येत्या २९ तारखेला पुणे जिल्ह्यात विविध ठिकाणी महाकुंभ रोजगार मेळावा आयोजित केला आहे. याअंतर्गत विविध उद्योग आणि आस्थापनांद्वारे योग्य व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येतील. शहरातल्या विविध महाविद्यालयांसह जुन्नर, मावळ, इंदापूर, दौंड, मुळशी, रांजणगांव, खेड, बारामती आणि आंबेगांवमध्ये २९ तारखेला रोजगार मेळावा होणार आहे. इच्छुक उमेदवारांनी रोजगार महास्वयम् या संकेतस्थळावर नांवनोंदणी करावी आणि अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्राशी संपर्क साधावा असं प्रशासनानं कळवलं आहे.

**जिल्हाधिकारी**

पुणे शहरातली वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या एसचीएमटीआर आणि रिंग रोड प्रकल्पांच्या भूसंपादनाला गती देण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्तांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत या दोन्ही प्रकल्पांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. विविध सरकारी विभागांच्या जमिनी हस्तांतरणाबाबतचे प्रस्ताव येत्या शुक्रवारपर्यंत राज्य सरकारकडं पाठवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

**रेल्वे वाहतूक**

हडपसर ते घोरपडीदरम्यानच्या सुमारे अडीच किलोमीटर लांबीच्या तिसऱ्या रेल्वे मार्गिकेचं काम पूर्ण झालं असून, लवकरच या मार्गिकेवरून वाहतूक सुरू होईल. या मार्गिकेमुळे पुणे-हडपसर मार्गावरील ‘क्रॉसिंग’चा अडथळा दूर होऊन रेल्वे वाहतूक अधिक सुलभ आणि जलद झाल्यामुळे पुणे स्थानकावरची वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवाशांच्या वेळेतही बचत होणार आहे, अशी माहिती रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी हेमंतकुमार बेहरा यांनी दिली.

**गणेशोत्सव एसटी**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन एसटीच्या पुणे विभागानं १७३ बसचे नियोजन पूर्ण केलं आहे. यंदा नियोजित बसला प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, मागणी वाढल्यास अतिरिक्त बस सोडण्याची तयारी ठेवण्यात आली आहे, अशी माहिती विभागीय वाहतूक अधिकारी कमलेश धनराळे यांनी दिली.

**रंगवाइको बाप्पा**

पुणे महापालिकेच्या शाळांमधल्या दोन हजार विद्यार्थ्यांसाठी महापालिका 'रंगवा इको बाप्पा' उपक्रम राबवणार आहे. याअंतर्गत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती, रंग आणि ब्रशचा संच देऊन विद्यार्थ्यांना मूर्ती रंगवण्याचं प्रशिक्षण दिलं जाईल. स्थायी समितीनं यासाठी २५ लाख रुपयांच्या प्रस्तावाला मान्यता दिल्याची माहिती समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

**पाणीपुरवठा बंद**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जलशुद्धीकरण केंद्रांच्या देखभाल दुरुस्तीसाठी येत्या गुरुवारी शहरातल्या बहुतांश भागातला पाणीपुरवठा बंद राहणार आहे. शुक्रवारी सकाळी उशीरा आणि कमी दाबानं पाणीपुरवठा केला जाईल असं महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागानं कळवलं आहे.

**सामाजिक उपक्रम**

गणेशोत्सवात सामाजिक बांधिलकीचं भान जपत तुळशीबागेतल्या गजानन मंडळ ट्रस्टनं यंदा ढोलपथकावरचा खर्च कमी करुन ६ विद्यार्थ्यांचं शालेय शुल्क भरलं आहे.

**कारवाई**

दहीहंडी उत्सवात ध्वनीमर्यादेचं उल्लंघन करणाऱ्या ११६ मंडळांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तसंच चार प्लाझ्मा, चार प्रेशर मीड आणि सहा ध्वनीयंत्रणा जप्त केल्या आहेत.

**वुशूस्पर्धा**

राज्यस्तरीय वुशू अजिंक्यपद स्पर्धा काल आळंदी इथं सुरू झाली. कनिष्ठ आणि उपकनिष्ठ अशा दोन गटांत होणाऱ्या या स्पर्धेत विविध जिल्ह्यांमधल्या ७२५ खेळाडूंनी सहभाग घेतला आहे.
या स्पर्धेतल्या गुणवान खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावरच्या स्पर्धांसाठी निवड केली जाणार आहे. भविष्यातील आंतरराष्ट्रीय आणि ऑलिम्पिक खेळाडू घडवण्याच्या दृष्टीनंही ही स्पर्धा महत्त्वाची ठरणार आहे.

**हवामान**

पुणे शहरात आज काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी पडल्या. उद्याही पावसाच्या हलक्या सरींची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**